RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

महाराष्ट्र शासन
स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य
कोंकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४
☎/ 🖷:-022-27571391 Website:www. mahalfa.in E.Mail:ad.computer@mahalfa.in

क्र.स्था.१८/ब/ **ONLINE HMM** /संगणक शाखा/कलेप/ न.क्र. ७५ब / ९४८८ दिनांक : 30 JUL 2018

## परिपत्रक

### विषय : MAINS प्रणालीमधील ONLINE HMM बाबत.

स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयांतर्गत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण करण्यात येते. सद्य:स्थितीत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका , नगरपंचायत तसेच महानगरपालिका या संस्थांचे लेखापरीक्षण अहवाल MAINS प्रणालीद्वारे तयार करुन निर्गमित करण्यात येतात.

लेखापरीक्षणाच्या सुरुवातीच्या दिनांकास लेखापरीक्षण करावयाच्या संस्थेला देण्यात येणारे अर्धसमास पत्र यापूर्वी MAINS प्रणालीमधून देण्यात येत नव्हते. यापुढे प्रणालीतून ONLINE पध्दतीने अर्धसमासपत्र तयार करुन निर्गमित करण्याची सुविधा देण्यात येत आहे.

तरी सदर परिपत्रक निर्गमित झाल्यापासून सर्व संबंधित लेखापरीक्षकांनी त्याचा अवलंब करुन संबंधित संस्थेस ONLINE पध्दतीने अर्धसमासपत्र तयार करुन निर्गमित करावे.

**ONLINE पध्दतीने अर्धसमासपत्र तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :**

१. संबंधित संस्थेच्या लेखापरीक्षणाचे वार्षिक नियोजन करण्यात यावे.
२. संबंधित संस्थेच्या लेखापरीक्षणाचे तपशीलवार नियोजन करण्यात यावे.
३. तपशीलवार नियोजनामध्ये पासून व पर्यंत या कालावधीतच ONLINE अर्धसमासपत्र देता येईल.
४. संस्थेच्या लेखापरीक्षणास पुढीलप्रमाणे ONLINE अर्धसमासपत्र निर्माण करता येईल.

AUDIT OPTION
↓
HMM
↓
ENTRY
↓
ONLINE
↓
NEW
↓
ENTRY
↓
अर्धसमासपत्राचा येणारा नमुना पूर्णपणे भरण्यात यावा व SAVE करावा.
↓
त्यानंतर ONLINE मधील VIEW OPTION मधून तयार झालेले अर्धसमासपत्र DOWNLOAD करावे.

५. सदर DOWNLOAD केलेले अर्धसमास ज्ञापन पथकप्रमुखाच्या सहीने संबंधित संस्थेस निर्गमित करावे.

तरी आपआपल्या स्तरावरुन सर्व लेखापरीक्षकांना कळविण्यात यावे आणि वरीलप्रमाणे कार्यवाहीचा तात्काळ अवलंब करण्यात यावा. कार्यवाही करताना अडचणी येत असतील तर ad.computer@mahalfa.in या ईमेल वर कळविण्यात यावे.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
नवी मुंबई.

**प्रत :१) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोंकण, मनपालेप, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.**

**२) उप संचालक, म.न.पा.ले.प.,उपविभाग ३, औरंगाबाद**

**३) सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व जिल्हा कार्यालये.**

surekha comp br. letter new ३००७१८